पुढारी

# दलित, महिलांना समतेची वागणूक द्या : टाकभौरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजामध्ये वर्णभेद, वर्गभेद, जातिभेद, लिंगभेद वाढत चालला आहे. त्यामुळे स्त्री आणि दलितांची स्थिती चिंताजनक होऊ लागली आहे. दलित व महिलांना कायद्याने सर्व अधिकार मिळाले आहेत; परंतु समाजामध्ये वास्तविकता खूपच विदारक आहे. जोपर्यंत समाज दलित आणि महिलांना सन्मान देत नाही तोपर्यंत समाजातील विषमता दूर होणार नाही. त्यासाठी त्यांना समानतेची वागणूक दिली पाहिजे, असे प्रतिपादन लेखिका सुशीला टाकभौरे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्या वतीने 'स्त्री और दलित विमर्श के मायने' या विषयावर आयोजित ऑनलाईन राष्ट्रीय व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार होते.

लेखिका टाकभौरे म्हणाल्या, वर्तमान काळातसुद्धा स्त्री आणि दलित वर्गावर अन्याय होत आहे. त्यांचे शोषण होत आहे. हे थांबवण्यासाठी मनुवादी मानसिकता बदलली पाहिजे.

प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ.आरिफ महात यांनी केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Jul 11, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

# मानवतेचे महत्त्व पटवून देणारे भक्ती साहित्य

## डॉ. खान; विवेकानंद महाविद्यालयात ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवतेचे महत्त्व पटवून देण्याची ताकद भक्ती साहित्यात आहे, असे प्रतिपादन अलीबाग येथील डॉ. मोहसीन अली खान यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत भक्ती साहित्य व संगीत परंपरा या विषयावर एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. प्रमुख वक्ते डॉ. खान यांनी भक्ती साहित्याची परंपरा सांगत भक्ती साहित्य मानवी जीवनात मानवता, उदारता, समानता, विश्वबंधूता यांचे महत्त्व पटवून दिले. संत कबीर, तुलसीदास, सुरदास, जायसी, मीराबाई यांच्या भक्ती साहित्याचे विवेचन केले. प्रा. महेश हिरेमठ यांनी संगीताला जात, भाषा व धर्म नसते, असे मत मांडले. डॉ. चंद्रकांत कांबळे अग्रणी महाविद्यालय योजनेबाबत माहिती दिली. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

श
वि
कोल्ह
क
स्तरांत
आहे.
केवळ
महावि
शुल्क
विद्यार्थ
उद्योग
पालक
बिघ
तंत्र

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003